# रिलेशनशिप सोशल मिडिया आणि लग्न

" सहा महिने आम्ही chat करत होतो. चांगलं जमलं होतं आमचं . खूप गप्पा मारत होतो जवळ जवळ रोज. आणि अचानक सहा महिन्यानंतर त्याने ' नाही ' म्हणून सांगितलं. आणि नाही म्हणून सांगताना त्याने नुसता एक साधा मेसेज करून नाही म्हणून सांगितल. प्रत्यक्ष भेटून नक्की काय झालं हे पण सांगता आला नाही त्याला. मला खूप डिप्रेस्ड वाटतंय. "

सुविधा च्या डोळ्यातलं पाणी थांबत नव्हतं.

" एका लग्न विषयक साईट वरून प्रथम त्यानंच इंटरेस्ट सेंट केला. नंतर मग फोन वर बोलणं होऊन भेटायचं ठरलं. आणि मग आमच्या गप्पा सुरु झाल्या.

मी हे घरी पण सांगितलं नव्हतं. तो म्हणाला कि आधी आपले आपण बोलूया. भेटूया. आधी मोठ्यांना नको यात घ्यायला. मग मी पण नाही सांगितले. मला वाटलं येईल नंतर सांगता, सगळं छान जमलं की .

पण त्यामुळे आता मला घरात मोकळेपणी वावरता येत नाहीये. मला समजत नाही काय करावं ते. का नाही म्हणाला असेल तो ? माझ्यात काय कमी आहे ? आणि ही काय पद्धत झाली का ?? सहा सहा महिने बोलल्यानंतर असं कसं हा नाही म्हणू शकतो ?? आणि आता तर तो माझे फोन ही घेत नाहीये. फेसबुक वरून पण त्यानं मला आता unfriend करून टाकलाय. whats app वर तर रोज आम्ही तासनतास बोलत होतो. त्यानी मला फसवलं, याचं दुःख मला जास्त होतंय. "

-------------------------------------------------------------------------

" काय ऑसम आहे नं ? मी गिटार वाजवतो आणि तुलाही आवडतं. काय विलक्षण योगायोग आहे. –" केदार बोलत होता नेहा शी . दोघे जण एका कॉफी शॉप मध्ये गप्पा मारत होते. कुठल्याशा

लग्न विषयक  साईट वरून  केदार ने  नेहा चे  प्रोफाईल पहिले होते.  आणि आज त्या संबंधाने दोघे भेटले होते .

नेहा म्हणाली “ गिटार आणि मी ? कुणी सांगितलं तुला ? मला नाही वाजवता येत गिटार .”

“ काहीही काय ?  अग मी फेसबुक प्रोफाईल पाहिले तुझे. त्यात तुझे तीन चार  फोटो आहेत हातात गिटार घेतलेले.  “

“  हां हां  ते  होय ?? “ असे म्हणून नेहा मोठ्या मोठ्याने हसू लागली. “ अरे come on , ती फक्त स्टाईल होती. तुला काय खरं वाटलं कि काय ? “ नेहाला हसू आवरेना.

केदारचा  चेहरा मात्र पाहण्यासारखा झाला  होता. त्याला झालेला भ्रमनिरास स्पष्टपणे त्याच्या चेहऱ्यावर दिसत होता.

“ काय कमाल आहे.... ती फक्त स्टाईल आहे ??? मग खरं काय आहे ? “

“ काही नाही रे. मी जस्ट हातात घेऊन पाहिलं गिटार. मग माझ्या मैत्रीणीने फोटो काढले आणि मग केले शेअर एफबी वर . बस इतकंच. “

-------------------------------------------------------------------

ही गल्लत अनेकदा होते.  माहिती खरी दिली आहे का हे तपासून पाहण्यासाठी मुले मुली सोशल मिडिया चा अतिरेकी वापर करताना दिसतात.  अनेकदा तर आमच्या विवाहसंस्थेच्या साईट वर दिलेली माहिती आणि फेसबुक वरची माहिती क्रॉसचेक करताना दिसतात. तसं पाहिलं  तर अनेक जण फेस बुक खूप casually वापरताना दिसतात. वेळ नसेल तर सहजपणे जाता जाता like करून जातात. किंवा नुसतच wow , भारी .. अशा पद्धतीच्या कोमेंट्स पास करताना दिसतात. आणि तरीही त्यावर खूप जास्त प्रमाणात भर देताना दिसतात. आपल्यापैकी प्रत्येकजण सतत निरनिराळे मुखवटे घेऊन वावरत असतो. शिवाय आपण सगळेजण आपल्या ओळखीतल्या प्रत्येक माणसाशी

वेगवेगळे वागत असतो. अनेकदा हे वेगवेगळे मुखवटे, वेगवेगळे वागणे ही व्यावसायिक गरज असू शकते.

निकिता एक image consultant . तिने तिचे खूप वेगवेगळ्या पेहरावातले फोटो instagram वर टाकले होते. तसेच फेसबुक वर देखील ते लोड केले होते. सूरज म्हणाला, ' इतक्या मॉड पोशाखातले फोटो आहेत. कशी असेल ही मुलगी ? आमच्या घरी नाही चालणार. '

कोणत्याही गोष्टीवरून आपण किती पटकन मते बनवतो नं ?

सोशल मिडिया आपल्या मनात अक्षरशः दिवसभर जागृतावस्थेत असतं. सतत आपण आपल्या मुखवट्यांचा विचार करत असतो. व्यावसायिक गरज असेल तर तेव्हढी गरज भागली की मुखवटा बाजूला सारता यायला हवा. पण अनेकदा तोच आपला खरा चेहरा बनून जातो. समाजासमोर present केलेला चेहरा तसाच्या तसा ठेवावा लागतो.

वरच्या पहिल्या उदाहरणासारखे देखील अनेकदा घडताना दिसते. कोणताही मुलगा आणि मुलगी पहिल्यांदा भेटतात त्यावेळी अनेकदा आपापले फोन नंबर्स एकमेकांना दिले जातात. आणि कॉफी शॉप मधून बाहेर पडल्यापासून ' पोचलीस का ? जेवलीस का ? गुड मॉर्निंग, गुड नाईट ' .. असे मेसेजेस ची सुरुवात होते. आणि मग विशेष करून मुलींना वाटायला लागते , की किती माझी काळजी करतोय हा मुलगा !! आणि मग त्यातूनच chatting ला सुरुवात होते. भावनिक दृष्ट्या कमकुवत असणारे त्यात अडकत जातात. ते नाते पुढे गेले तर ठीक असते पण वरच्या उदाहरणाप्रमाणेच अनेकदा घडताना दिसते.

कोणत्याही सोशल मिडिया चा वापर, whats app चा वापर फक्त कुठे भेटूया , किती वाजता भेटूया अशा जुजबी कारणासाठी केला जावा असे मला वाटते. आमच्या सगळ्या कार्यक्रमामधून आम्ही हे सातत्याने सांगत असतो. आजही मुली कितीही शिकलेल्या आणि स्वतःच्या पायावर उभ्या असलेल्या असल्या तरी देखील माझ्या नवऱ्याने माझी काळजी घेतली पाहिजे ही अपेक्षा

मनातून गेलेली नाही. आणि दुर्दैवाने पोचलीस का , जेवलीस का .... हीच काळजी घेण्याची वाक्ये वाटायला लागतात आणि विशेषकरून मुली या गोष्टीमध्ये अडकत जातात.

फेसबुक वर किंवा whats app बोलणे , मेल वर बोलणे हे प्रत्यक्ष बोलण्यापेक्षा तुलनेने खूप सोपे असते. आपण विचार करून, शब्द योजना ठरवून मेसेज लिहू शकतो. समोर भेटताना जसे डोळ्याला डोळा भिडवून बोलले जाते तसा प्रकार लिहिताना नसतो. समोर समोर भेटून जेव्हा बोलतो तेव्हा आपल्या अनेक गोष्टी लक्षात येतात, जसे कि त्या व्यक्तीचा condidence , देहबोली , बोलण्याची ढब , समोरच्याचा आदर करण्याची पद्धत इ. तशा कोणत्याच गोष्टी लिखाणातून काळात नाहीत. त्यामुळे शक्य असेल तेव्हा मुला मुलींनी प्रत्यक्ष भेटणे हे निश्चितच स्वागतार्ह आहे.

तरीही परदेशी राहणारी मुले मुली किंवा दोन वेगवेगळ्या शहरात राहणाऱ्या मुला मुलींना वारंवार भेटणे हे शक्य होत नाही. अशावेळी chatting चा पर्याय नक्की चांगला असतो. पण सुरुवातीचे जुजबी बोलणे झाले कि भेट नक्की घ्यावी. कारण अशा प्रकारच्या chatting मध्ये गुंतायला होते. त्यातच रमायला होते. तो मुखवटा असू शकतो, याचा विसर पडण्याचा संभाव असतो. आणि मग या खोट्या रमण्याचा एक विचात्र ताण मनावर येऊ शकतो. आणि त्यातूनच मग नैराश्या सारख्या विविध मानसिक समस्या निर्माण होऊ शकतात. लग्न ठरवत असताना सोशल मिडियाचा वापर अजिबात करू नये असे माझे म्हणणे नाही पण त्याचा वापर हा सजगतेने करायला हवा हे नक्की. एखादी व्यक्ती जर अनेक महिने नुसती chat करत असेल आणि काहीच निर्णय घेत नसेल तर वेळीच सावध होणे ही बाब आवश्यक ठरते. पालकांनी देखील यामध्ये लक्ष घालणे, आणि घरातल्या लग्नेच्छू मुला मुलींना सावध करणे आवश्यक आहे. सोशल मिडिया आपल्या आयुष्यातून वजा करता येणे अवघड आहे, पण निदान त्याचा वापर अतिशय काळजीपूर्वक पद्धतीने करणे आपल्या हातात आहे आणि हे तर आपण नक्कीच करू शकतो.

आभासी जग